# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.03.2026** **वारःसोमवार**

---

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर, बारामती आणि राहुरी मतदारसंघात २३ एप्रिलला पोटनिवडणूक

शाश्वत विकासासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचं राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचं प्रतिपादन

पुण्यामध्ये २०० किलोमीटरचं मेट्रोचं जाळं तयार करणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

पीएनजी जोडणी धारकांनी एलपीजी जोडणी परत करावी असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचं आवाहन

आणि

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत तीनही प्रमुख पदांवर साहित्य संवर्धन आघाडीचा विजय

**<u>असेंब्ली निवडणुका-पूल-मंजिरी</u>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं काल नवी दिल्लीत आसाम, केरलम, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर केलं. आसाम, केरलम आणि पुदुच्चेरीत ९ एप्रिलला तर तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये पुढील महिन्याच्या २३ आणि २९ तारखेला दोन टप्प्यात मतदान होईल. निवडणूक होत असलेल्या या चार

राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात आता आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे. या शिवाय निवडणूक आयोगानं सहा राज्यांतील आठ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील राहुरी आणि बारामती  या दोन विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या दोन्ही पोटनिवडणुकांसाठी २३ एप्रिलला मतदान होईल. या सर्व ठिकाणी 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे. 30 मार्च रोजी निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली जाईल. 6 एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, 7 एप्रिलला अर्जांची छाननी होईल, तर 9 एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील आणि 23 रोजी मतदान होणार आहे.

माजी उपमुख्यमंत्री आणि बारामती मतदारसंघाचे आमदार अजित पवार, तसंच राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्यानं ही पोटनिवडणूक होत आहे.

**<u>राहुरीकृविसीएम</u>**

देशाची अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि शाश्वत विकासासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असं प्रतिपादन राज्यपाल आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी काल केलं. राहुरी इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या 39व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते.. कृषी विद्यापीठाच्या स्नातकांनी, संशोधन, तंत्रज्ञान, नवोन्मेष यावर भर द्यावा, असं आवाहनही राज्यपालांनी केलं.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' या मानद पदवीनं सन्मानित करण्यात आलं.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं. डिजीटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतीच्या खर्चामध्ये 25 टक्क्यांपर्यत बचत होऊन उत्पादनात 30 ते 40 टक्क्यांपर्यत वाढ होत असल्याची माहिती त्यांनी

दिली. राज्यातील शेतकऱ्यांना जलसुरक्षा आणि उर्जासुरक्षा देणं ही आमच्या सरकारची प्राथमिकता आहे, असं सांगून ते म्हणाले....

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यावेळी उपस्थित होते.  या सोहळ्यात ४ हजार ६०२ स्नातकांना पदवी, पदव्युत्तर पदवी, आणि आचार्य पदवी प्रदान करण्यात आली.

**पुणेमेट्रो**

पुणे शहराची वेगानं होत असलेली वाढ लक्षात घेऊन येत्या काही वर्षात पुणे परिसरात दोनशे किलोमीटर लांबीचं मेट्रो मार्गांचं जाळं तयार करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली.  पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकावरील मेट्रो भवनच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. मेट्रो मार्गांच्या विस्तारासाठी सर्वंकष प्रकल्प आराखडा तयार करण्याचे निर्देश महा मेट्रोला देण्यात आले आहेत, शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो मार्गिकेतील ११ किलो मीटरचा टप्पा येत्या मे महिन्यात सुरू करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.  उर्वरित १२ किलोमीटर मार्गाचं काम जुलैपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असं ते म्हणाले....

देशात गॅसचा पुरेसा साठा असून, नागरिकांना रांगा लावण्याची गरज नाही, काँग्रेसचे काही नेते विनाकारण जनतेमध्ये भीती निर्माण करत आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केलं.

**पेट्रोलियमनिवेदन**

देशभरातील कोणत्याही एलपीजी वितरकांकडील गॅस पुरवठा खंडित झाल्याची एकही घटना नोंदवली नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट केलं आहे. एलपीजी नोंदणीचं प्रमाण १३ तारखेला एका दिवसात ८८ लाखांवर पोहोचलं होतं. मात्र आता त्यामध्ये घट होत असून ते ७७ लाखांवर आलं आहे, अशी माहितीही या निवेदनात दिली आहे. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ग्राहकांसाठी व्यावसायिक एलपीजी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत, असंही मंत्रालयानं नमूद केलं आहे. पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठाही सुरळित असल्याचं तेल विपणन कंपन्यांनी कळवलं आहे.

**<u>पीएनजीधारकआवाहन</u>**

देशातल्या ज्या घरांमध्ये इंधनासाठी पीएनजी अर्थात पाईपद्वारे नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरु आहे, त्यांनी एलपीजी सिलिंडर वापरू नयेत आणि पीएनजी वापरणाऱ्यांच्या नावे सिलिंडर जोडण्या असल्यास त्यांनी त्या परत कराव्यात असं सरकारने म्हटलं आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

**<u>मसाप-डेस्क-माधवी</u>**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत साहित्य संवर्धन आघाडीचे उमेदवार, लेखक-नाटककार योगेश सोमण यांनी विजय मिळवला आहे. प्रमुख कार्यवाहपदी पत्रकार स्वाती महाळंक यांनी तर कोषाध्यक्षपदी गझलकार प्रदीप निफाडकर यांनी विजय मिळवला आहे. मसापच्या पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी काल झाली; त्यानंतर रात्री उशिरा निकाल जाहीर करण्यात आला.

**<u>बोर्डीकरपुरस्कार</u>**

राज्याच्या ऊर्जा, महिला आणि बालविकास, तसंच सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड टू चेंजमेकर’ हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार

जाहीर झाला आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसी इथल्या युएस इंडिया एसएमई कौन्सिलच्या वतीनं शनिवारी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. येत्या 25 मार्च रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपममध्ये आयोजित विशेष समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**राष्ट्रीयपरिषद**

देशभरातील महिला लोकप्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद २२ मार्च रोजी दिल्लीमध्ये होणार आहे. महाराष्ट्रातून २६ महिला लोकप्रतिनिधी या राष्ट्रीय परिषदेत सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय परिषदेसाठी दौंड तालुक्यातील पानवलीच्या सरपंच प्रज्ञा भांड यांची निवड झाली असून, या परिषदेत त्या पुणे जिल्ह्याचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

**बीडीडीसदनिका वितरण**

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पूर्ण झालेल्या नायगांव इथल्या ५ पुनर्वसन इमारतींतील ८६४ पात्र रहिवाशांना आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात सदनिकांचं वितरण करण्यात येणार आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रात वितरण कार्यक्रम होणार आहे.

**योजनामहाशिबिर**

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्याची जबाबदारी न्यायव्यवस्थेची आहे, असं प्रतिपादन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय आहुजा यांनी केलं. कोल्हापूरमध्ये काल विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शासनाच्या विविध योजनांचा संबंधित गरजूंना विविध लाभ देण्यात आला.

नाशिकमध्ये आयोजित लोकन्यायालयात 16 हजार 826 प्रकरणे निघाली निकाली काढण्यात आली. सर्व प्रकरणांमध्ये तडजोडीअंती सुमारे 86 कोटींहून अधिक रूपये तडजोड शुल्क म्हणून वसूल करण्यात आलं.

**देवराईप्रकल्प**

रत्नागिरी जिल्ह्याच्या चिपळूण तालुक्यातल्या कळंबस्ते इथे उभारण्यात आलेल्या 'देवराई – द बोटॅनिकल गार्डन' या प्रकल्पाचं लोकार्पण शनिवारी पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आलं. 'पर्यावरण संवर्धनासाठी देवराईसारख्या उपक्रमांची मोठी गरज असून, लोकसहभागातून उभारलेली ही देवराई भविष्यात निसर्ग संवर्धनासाठी प्रेरणादायी ठरेल,' असं सामंत यावेळी म्हणाले. प्रांताधिकारी कार्यालय आणि सह्याद्री निसर्गमित्र संस्था यांच्या पुढाकारातून हा प्रकल्प उभारण्यात आला आहे.

**बाळूमामारथोत्सव**

भंडाऱ्याची मुक्तहस्ते उधळण, पारंपरिक वाद्यांचा गजर, अश्वांचं नृत्य आणि बाळूमामाच्या नावानं चांगभलं चा जयघोष करत कोल्हापूर जिल्ह्याच्या भुदरगड तालुक्यातील श्रीक्षेत्र आदमापुर इथं सद्गुरु बाळूमामा यांचा रथोत्सव कालपासून सुरू झाला. या उत्सवात राज्याच्या विविध भागातील तसंच कर्नाटक, गोवा येथील भाविकांचाही सहभाग असतो.

**काचबिंदूजनजागृती**

जागतिक काचबिंदू सप्ताहानिमित्त परभणी नेत्रतज्ञ संघटनेतर्फे काल जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. परभणी शहरातील नेत्रतज्ञ आणि रुग्णालयातील कर्मचारी ह्या रॅलीत सहभागी झाले होते. काचबिंदू रोखण्यासाठी डोळ्यांची नियमित तपासणी करणं हाच एकमेव उपाय असल्याचं संघटनेचे सचिव डॉ. विजयसाई शेळके यांनी सांगितलं.

**<u>हवामान-</u>**

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी काल पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय वाढ झाली. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**